**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmparbhani@yahoo.com**

**बीड कृषि हवामान सल्ला** **शुक्रवार, दिनांक – ०९. १०.२०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक १० ते १४ ऑक्टोबर, २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १०/१० | ११/१० | १२/१० | १३/१० | १४/१० |
| पाऊस (मिमी) | ६.० | २१.० | २२.० | १८.० | ९.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३४.० | ३३.० | ३२.० | ३२.० | ३१.० |
| किमान तापमान (अं.से.) | २४.० | २५.० | २४.० | २४.० | २५.० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७७ | ७५ | ८५ | ८५ | ८९ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ४७ | ५३ | ५७ | ४८ | ७५ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | ८ | १० | १२ | १५ | १५ |
| वा-याची दिशा | वायव्य | वायव्य | वायव्य | वायव्य | वायव्य |

| हवामानाचा इशारा | जिल्ह्यात पुढील पाच दिवसात आकाश ढगाळ राहून तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक ११ ते १३ ऑक्टोबर २०२० दरम्यान जिल्ह्यात बर्याच ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| सोयाबीन | काढणी अवस्था | पावसाची शक्यता असल्यामुळे काढणीस तयार असलेल्या सोयाबीन पिकाची काढणी पावसाचा अंदाज बघून लवकरात लवकर करावी व सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| खरीप ज्वारी | काढणी अवस्था | पावसाची शक्यता असल्यामुळे वेळेवर पेरणी केलेल्या व काढणीस तयार असलेल्या खरीप ज्वारी पिकाची कापणी पावसाचा अंदाज बघून लवकरात लवकर करावी. कापणी केलेले खरीप ज्वारी पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| बाजरी | काढणी अवस्था | वेळेवर पेरणी केलेल्या व काढणीस तयार असलेल्या बाजरी पिकाची कापणी पावसाचा अंदाज बघून लवकरात लवकर करावी. कापणी केलेले बाजरी पावसात भिजणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ऊस | वाढीची अवस्था | ऊस पिकावर रसशोषन करणा-या किडींचा (पांढरी माशी, पाकोळी) प्रादुर्भाव दिसून येत आहे याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २०% ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. |
| हळद | कंद वाढीची अवस्था | हळद पिकात कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे याच्या व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५ % २० मि ३० किंवा डायमिथोएट .ली.% १० मिलिटर १० प्रति .ली. पाण्यात मिसळून चांगल्या दर्जाचे स्टिकरसह पावसाने उघाड दिल्यास आलटुनपालटून - फवारणी करावी, उघडे पडलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. (हळद पिकावर केंद्रीय किटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्यामुळे विदयापीठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत). |
| हरभरा | वाणांची निवड | हरभरा पिकाच्या पेरणीसाठी विजय, विशाल, आकाश, विकास (फुले जी-१२), बीडीएन-९-३, बीडीएनजी-७९७ यापैकी एका वाणाची निवड करावी. |

| | | |
|---|---|---|
| करडई | वाणांची निवड | करडई पिकाच्या पेरणीसाठी अन्नेगिरी-१, भिमा, शारदा, परभणी-१२, परभणी-४० (बिन काटेरी), ऐकेएस-३२७, एसएसएफ-६५८, नारी-६ या सारख्या अधिक उत्पादन देणा-या वाणांपैकी एका वाणाची निवड करावी. |
| संत्रा /मोसंबी | फळवाढीची अवस्था | संत्रा / मोसंबी फळबागेत रसशोषन करणारे पतंग यांच्या व्यवस्थापनासाठी खाली पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत. सायंकाळी बागेत कडूनिंबाचा पाला व शेणाच्या गौ-या यांचा धुर करावा तसेच विषारी अमिष (१०० मिली फळाचा रस □ १०० ग्रॅम गुळ □ १० मिली मेलॅथीऑन किटकनाशक व ९०० मिली पाणी मिसळून) पसरट तोंडाच्या डब्ब्यामध्ये टाकून बागेमध्ये लटकून ठेवावेत. तसेच फोरेट १०□ १० ग्रॅम सुती कपडयामध्ये पुडी बांधून प्रत्येक झाडावर लावावेत. पंधरा दिवसांच्या अंतराने पिशव्या बदलाव्यात. लिंबुवर्गीय पिकांत कोळी किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे याच्या व्यवस्थापनासाठी डायकोफॉल १८.५□ २ मिली किंवा प्रोपरगाईट २०□ १ मिली किंवा इथिऑन २०□ २ मिली किंवा विद्राव्य गंधक ३ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. आवश्यकता असल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी. |
| डाळिंब | फळ वाढीची अवस्था | डाळिंब फळपिकात तेल्या रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी फवारणी करावी. बागेतील तणांचे व्यवस्थापन करावे. बागेतील फुटवे काढावे. |
| चिकू | वाढीची अवस्था | चिकु बागेतील तणांचे व्यवस्थापन करावे. |
| फुल शेती | काढणी अवस्था | काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी करावी. फुलपिकातील तणांचे व्यवस्थापन करावे. |
| भाजीपाला | वाढीची/काढणी अवस्था | भेंडी पिकावरील पांढरी माशीच्या व्यवस्थापनासाठी फेन्प्रोपॅथ्रीन ३०% ईसी ३.५ मिली किंवा ऑक्सीडिमेटॉन मिथाईल २५% ईसी २० मिली किंवा थायामिथॉक्झाम २५% डब्ल्युजी २ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. कांदा पिकावरील करपा रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेबुकोनॅझोल २५.९% ईसी १०मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाउ दिल्यास फवारणी करावी. |
| चारा पिके | वाढीची अवस्था | रब्बी हंगामात ज्वारी या चारा पिकाच्या लागवडीसाठी रूचीरा आर-४-११, मालदांडी-३५-१, निळवा, एमपी चारी, पुसा चारी, आय एस ४७७६, एएसजी –१४ किंवा एमकेव्ही चारी या वाणांपैकी एका वाणाची निवड करावी. |
| तुती रेशीम उदयोग | -- | कोष तयार झाल्यानंतर पाचव्या किंवा सहाव्या दिवशी कोष काढणी करून लगेच बाजारात विक्री करणे गरजेचे आहे. दहाव्या दिवसापर्यंत थांबू नये, नाहीतर कोषात पतंग तयार होऊन कोषास छिद्र पाडून बाहेर पडतो आणि कोषास कमी भाव लागतो. कोषाची ४ ते ६ सहा महिने साठवणूक करणे शक्य आहे, पण त्यासाठी कोष काढणीनंतर लगेच ते कडक उन्हात ५ दिवस वाळवणे आवश्यक आहे (७० अंश सेल्सिअस तापमान ५ तास बिओडीमध्ये ठेवावेत). ज्या ठिकाणी कोषाची साठवणूक करावयाची आहे. तेथे डेल्टामेथ्रीन ०.०२८% ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. नाहीतर तेथे लाल भुंगेरे (ईमीस्टीड बिटल) चा प्रादुर्भाव होतो व कोषातील शंखी कोषास छिद्र पाडून खातात. |

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.